अॅग्रोवन सरपंच महापरिषद २०१६ • शिर्डी

साकुरी, शिर्डी (जि. नगर) येथे शुक्रवारपासून (ता. १९) अॅग्रोवन सरपंच महापरिषदेला सुरवात झाली. महापरिषदेच्या पहिल्या दिवसाच्या सत्रात मंत्रिमहोदय, उद्योजक आणि कृषितज्ज्ञांचे विचार ऐकण्याची व मार्गदर्शन घेण्याची संधी राज्यभरातील उपस्थित सरपंचांना मिळाली. त्या निमित्ताने कृषिकेंद्रित ग्रामविकास करण्याची दिशाही निश्चित होण्यास मदत झाली.



**शिर्डी, जि. नगर : सरपंच महापरिषदेत राज्यभरातून आलेल्या सरपंचांना मान्यवरांचे विचार ऐकण्याची संधी मिळाली.**

# 'कॉर्पोरेट फार्मिंग' वाढणे आवश्यक : फिरोदिया



**अभय फिरोदिया**

गावाच्या विकासामध्ये शेतीचे स्थान महत्त्वाचे आहे. मात्र, पारंपरिक पद्धतीला सोडून नवीन तंत्रज्ञानाने शेती करण्यासह शेतीमध्ये शेतकऱ्यांच्या कंपन्या उभारून 'कॉर्पोरेट फार्मिंग' वाढण्याची गरज आहे, असे प्रतिपादन फोर्स मोटर्सचे अध्यक्ष अभय फिरोदिया यांनी केले.

सकाळ-अॅग्रोवनच्या वतीने आयोजित सरपंच महापरिषदेच्या उद्‍घाटन कार्यक्रमात फिरोदिया बोलत होते. ते म्हणाले, की सकाळ माध्यम समूहाने सरकार आणि समाज यातील महत्त्वाचा दुवा ठरणाऱ्या सरपंच आणि कृषी क्षेत्रातील मान्यवरांना महापरिषदेच्या निमित्ताने एकत्र आणले. हा सुरू केलेला उपक्रम स्तुत्य असा आहे. शेतीत नवे बदल होत आहेत, नवेनवे तंत्रज्ञान येते आहे; पण त्याचा अवलंब करण्यात आपण कुठे तरी कमी पडतो आहोत. त्यावर लक्ष द्यायला हवं. सरकार योजनांमध्ये बदल करेल, धोरण ठरवेल, प्रोत्साहन देईल; पण प्रत्यक्षात काम आपल्यालाच करावे लागणार आहे, हे लक्षात घ्यायला हवे. खऱ्या अर्थाने समाजात बदल घडवण्यासाठी गावचा प्रमुख म्हणून सरपंच महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. त्या दृष्टीने मी तुमच्याकडे पाहतो.

**आज प्रत्येक कुटुंबात १७ ते १८ वयोमानातील तरुणांची संख्या अधिक आहे. या तरुणांनी शेतीमध्ये, गावाच्या विकासामध्ये आपली शक्ती उपयोगी आणावी. केवळ शक्ती असून चालत नाही, त्याला युक्तीची जोड हवीच आणि शक्ती-युक्तीबरोबर तंत्रज्ञानाची जोडही महत्त्वाची आहे.**

**- अभय फिरोदिया,** अध्यक्ष, फोर्स मोटर्स